नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २३० Issue - 230 | वार सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ Blow- Monday Date 6 January 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## थोडक्यात...

### मनोज जरांगेंविरुद्ध परळीत अदखलपात्र गुन्हा, बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी निदर्शने

छत्रपती संभाजीनगर : अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरुद्ध मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी परभणीतील मूक मोर्चा दरम्यान काढलेल्या विधानावरून त्यांच्यावर परळी शहर पोलीस ठाण्यात रविवारी सायंकाळी अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी तुकाराम बाबूराव अघाव यांनी तक्रार दिली आहे. दरम्यान, परळी पोलीस ठाण्यासमोर ओबीसी समाजाच्या वतीने धनंजय मुंडे यांच्या विरोधात करण्यात येणाऱ्या विधानांवरून दुपारच्या वेळी जोरदार निदर्शने करण्यात आली. मनोज जरांगे, अंजली दमानिया व सुरेश धस यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशा घोषणा देण्यात आल्या. अशीच काही आंदोलने बीड जिल्ह्यातील अन्य काही शहरांमध्ये करण्यात आली.

# छत्तीसगडमध्ये चकमकीत चार नक्षली ठार, एक पोलीस शहीद

## शस्त्रास्त्रे घटनास्थळावरून जप्त; चकमकीनंतर परिसरात शोधमोहीम



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

दंतेवाडा, छत्तीसगड : छत्तीसगडमधील बस्तरमध्ये सुरक्षा दलासोबत झालेल्या चकमकीत चार नक्षली ठार झाले तर एक पोलीस शहीद झाला. ही चकमक शनिवारी सायंकाळी नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्यातील सीमेवर दक्षिणेकडील अबूझमाडच्या जंगलात झाली. चकमक झाली त्यावेळी डीआरजी (डिस्ट्रिक्ट रिझर्व्ह गार्ड) आणि एसटीएफचे संयुक्त पथक नक्षलविरोधी मोहिमेवर निघाले होते. या चकमकीत डीआरजीचे हेड कॉन्स्टेबल सन्नू करम हे शहीद झाल्याची माहिती एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिली.

चकमकीनंतर गोळीबार थांबताच चार नक्षल्यांचे मृतदेह आणि एके-४७ रायफल व सेल्फ लोडिंग रायफल (एसएलआर)सह स्वयंचलित शस्त्रास्त्रे घटनास्थळावरून जप्त करण्यात आली. दरम्यान, चकमकीनंतर परिसरात शोधमोहीम सुरूच होती. नारायणपूर, दंतेवाडा, कोंडागाव आणि बस्तर जिल्ह्यांत डीआरजी पथकासोबत नक्षलविरोधी मोहीम शुक्रवारपासून सुरू करण्यात आली होती.

दरम्यान, मुख्यमंत्री विष्णू देव सहाय यांनी सुरक्षा दल नक्षलवादाविरोधात म जबुतीने लढत असून ही समस्या संपुष्टात येईपर्यंत लढाई सुरूच राहणार असल्याचे म्हटले आहे. तसेच शहीद सन्नू करम यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे 'एक्स'वर त्यांनी नमूद केले.

**यापूर्वी ३ जानेवारी रोजी छत्तीसगडमधील गरियाबंद जिल्ह्यात सुरक्षा दलासोबत झालेल्या चकमकीत एक नक्षली ठार झाला होता. हा परिसर रायपूर विभागात येतो. दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षी राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलाने २१९ नक्षल्यांना ठार केले होते. राज्यातील बस्तर विभागात दंतेवाडा आणि नारायणपूरसह सात जिल्ह्यांचा समावेश आहे.**

# तटरक्षक दलाच्या हेलिकॉप्टरला अपघात; तीन जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पोरबंदर : गुजरातमधील पोरबंदर विमानतळावर एका हेलिकॉप्टरला अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. हे हेलिकॉप्टर तटरक्षक दलाचं असून हेलिकॉप्टर कोसळ्यामुळे तीन जण ठार झाल्याची माहिती समोर आली. या घटनेत काही जण जखमी झाल्याचं सांगितलं जात आहे. यामध्ये दोन वैमानिकांसह तीन क्रू मेंबर्सचा समावेश आहे.

तटरक्षक दलाचं हेलिकॉप्टर कोसळ्याची ही घटना रविवारी दुपारी १२ वाजता घडली असल्याची माहिती पोरबंदरचे पोलीस अधीक्षक भगीरथसिंह जडेजा यांनी सांगितली. या अपघाताच्या घटनेनंतर जखमी झालेल्यांना उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहेत. भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांनी मृत्यूची पुष्टी केली. तसेच या अपघाताची चौकशी केली जाईल असंही स्पष्ट करण्यात आलं आहे. ही अपघातीची घटना घडल्यानतंर समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, हेलिकॉप्टर टेक ऑफ दरम्यान तांत्रिक बिघाड झाला होता, त्यानंतर हेलिकॉप्टर क्रॅश झालं. उड्डाण करताना हेलिकॉप्टरमध्ये दोन वैमानिकांसह अन्य तीन जण होते. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. वास्तविक तटरक्षक दलाच्या विमानाने नियमित प्रशिक्षणासाठी टेकऑफ केले होते. पण काही तांत्रिक बिघाडामुळे हेलिकॉप्टर लँडिंग दरम्यान क्रॅश झाले आणि त्यात बसलेल्या तिन्ही जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अशीच घटना दोन महिन्यांपूर्वी घटली होती. त्या घटनेत देखील तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टरही अशाच प्रकारे कोसळले होते.

# एसटी घोटाळ्याची चौकशी सुरू; तत्कालीन मुख्यमंत्र्यांना अंधारात ठेवून निविदेत फेरफार केल्याचे उघड

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



मुंबई : राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) १३१० बसच्या खरेदी प्रक्रियेची चौकशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने सुरू झाली असून निविदा प्रक्रियेची सर्व कागदपत्रे सादर करण्याचे आदेश महामंडळास देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे खरेदीसाठी २१ विभागनिहाय निविदा काढण्याच्या संचालक मंडळाच्या प्रस्तावास तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली असताना महामंडळाच्या स्तरावर निविदेतील अटी-शर्ती बदलण्यात आल्याचे समोर आले आहे.

राज्य सरकारला अंधारात ठेवून परिवहन महामंडळाच्या गाड्या खरेदीत मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि काही ठरावीक ठेकेदारांवर मेहेरनजर दाखविण्यात आल्याचे समोर आल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी निविदा प्रक्रियेला स्थगिती देत चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी यांनी संबंधित कागदपत्रे सादर करण्याचे आदेश महामंडळास दिले आ-हेत. चौकशीचा ससेमिरा पाठी लागल्यामुळे महामंडळातील अधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता असल्याचे वृत्त आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नोव्हेंबर २०२३ मध्ये महामंडळाच्या संचालक मंडळाने विभागनिहाय १३१० बसगाड्या घेण्याचा निर्णय घेतला. या प्रस्तावास फेब्रुवारी २०२४ मध्ये शिंदे यांनी मान्यता दिली. मात्र त्यानंतर महिनाभरात परिवहन विभागाने मूळ प्रस्तावात बदल करून मुंबई, पुणे-नाशिक आणि अमरावती-नागपूर अशा तीन समूहांसाठी (क्लस्टर) निविदा काढण्याचा प्रस्ताव तयार केला. ठेकेदारांच्या हितासाठी निविदेतील अटी-शर्तींमध्येही बदल करण्यात आले. उपमहाव्यवस्थापक दर्जाच्या काही अधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव पुन्हा संचालक मंडळासमोर मांडण्याची भूमिका घेतली असता संबंधित अधिकाऱ्यांचीच बदली करण्यात आली आणि निविदा प्रक्रिया राबवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. विशेष म्हणजे प्रक्रिया राबविण्यासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्याला नऊ महिन्यांसाठी मुदतवाढही देण्यात आल्याची चर्चा आहे.

**सल्लागाराच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

निविदा प्रक्रियेतील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे महामंडळाने नेमलेल्या सल्लागाराने अगोदर ठेकेदारांच्या लघुत्तम दरांना सहमती दर्शविली होती. त्यानुसार कंपन्यांना देकार पत्रेही देण्यात आली.

मात्र हे दर कमी असल्याचे सांगत तिन्ही कंपन्यांनी बस पुरविण्यास नकार दिला. त्यानंतर लाल गालिचा टाकून त्या कंपन्यांसाठी पुन्हा चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले आणि वाढीव दराचा प्रस्ताव मान्य केला गेला. महामंडळाच्या हितासाठी नियुक्त करण्यात आलेल्या व आधीच्या दरांना मान्यता देणाऱ्या सल्लागारानेच अवघ्या काही दिवसांत वाढीव दरांचे समर्थन करण्याची भूमिका घेतली. या सर्व बाबींचा खुलासा चौकशीतून होईल अशी माहितीही सूत्रांनी दिली आहे.

# केजरीवालांच्या शासकीय निवासस्थानावर ३३ कोटींचा खर्च; पंतप्रधान मोदींची टीका



नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी कॅगचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर राजधानीमध्ये राजकारण चांगलेच तापले आहे. द इंडियन एक्सप्रेसने दैनिकाने कॅगच्या हवाल्याने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानाच्या नुतनीकरणावर केलेल्या खर्चाचा तपशील दिला आहे. आता या बातमीचा आधार घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आम आदमी पक्ष आणि पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका केली आहे. या निवासस्थानावर केलेला खर्च हा 'आप'च्या भ्रष्टाचाराचा नमुना असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी एका जाहीर सभेत म्हटले.

दिल्लीत भाजपाच्या परिवर्तन मेळाव्यात बोलत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज एका मोठ्या वृत्तपत्रात अरविंद केजरीवाल यांच्या शीश महालवर झालेल्या खर्चाचा तपशील देण्यात आला आहे. कॅगच्या अहवालात नमूद केलेल्या आकडेवारीवर ही बातमी आहे. करोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण देश झगडत होता. तेव्हा आम आदमी पक्ष शीश महाल बांधण्यात व्यस्त होता. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक म्हणजेच 'कॅग'च्या अहवालावर आधारित द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या बातमीत अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्ती आणि सुशोभिकरणावर झालेल्या खर्चाचा तपशील दिला आहे. नुतनीकरणासाठी सुरुवातीला ७.९१ कोटींचा खर्चाचा प्रस्ताव दिला गेला. मात्र नंतर हा खर्च वाढून २०२० मध्ये तब्बल ८.६२ कोटींची तरतूद करण्यात आली. मात्र २०२२ रोजी जेव्हा नुतनीकरणाचे काम पूर्ण झाले तेव्हा त्याची एकूण किंमत ३३.६६ कोटींवर गेली होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, दिल्लीवर 'आप'दा आणणारे हे लोक केंद्रावर खोटा आरोप करतात की, केंद्र सरकार आम्हाला काम करू देत नाही. केंद्र सरकार पैसे देत नाही. पण हे लोक किती खोटारडे आ-हेत, याचे उदाहरण यांचा शीश महाल पाहून कळते. आजच एका मोठ्या वृत्तपत्राने शीश महालावर झालेल्या खर्चाचा तपशील दिला आहे. करोना काळात दिल्लीतील लोक औषध आणि ऑक्सिजनासाठी झगडत होते, तेव्हा हे लोक आपला शीश महाल बनविण्यात दंग होते.

**कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली माहिती** — **अकरा हजारांची फसवणूक**

# विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी पैसे घेऊन भाविकांची फसवणूक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ४ जानेवारी रोजी कुणाल दीपक घरत, रा. बिलाल पांडा, नालासोपार पूर्व, ता. वसई जिल्हा पालघर हे भाविक आपल्या कुटुंबासह सकाळी ११ वाजता या दरम्यान श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनाकरिता आले होते. यावेळी त्यांच्याकडून दर्शनासाठी पैसे म्हणून अकरा हजार रुपये घेऊन भाविकांची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आलेली माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

संबंधित भाविक हे लवकर दर्शन घेण्यासाठी मंदिर परिसरात विचारपूस करीत असताना मंदिराजवळ उभा राहिलेले लोकांनी दर्शनासाठी कमीत कमी आठ ते दहा तास लागतील असे सांगितले व दर्शनासाठी पास मिळतो का अशा बाबत चौकशी करीत असताना चिंतामणी उर्फ मुकुंद मोहन उत्पाद पंढरपूर या इसमाने मी मंदिरात पुजारी आहे व तुमचे देवाचे दर्शन रांगेत न थांबता लवकरात लवकर घडवून आणतो असे सांगून पैसे द्यावे लागतील पाच हजार रुपये ची मंदिर समितीची पावती देतो व सहा हजार रुपये मलावर द्यावे लागतील असे एकूण रोख रक्कम रुपये ११००० स्वीकारले व त्यानंतर तुकाराम मोहन येथील देणगी कार्यालयात जाऊन पाच हजार रुपये ची भाविकांच्या नावे देणगी पावती करून संबंधित भाविकाला दिली व त्यानंतर मंदिराच्या उत्तर दरवाजातून प्रवेश करीत असताना तेथील पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस नितीन होळकर यांनी चौकशी केली असता देवदर्शन करून देण्याच्या नाव नावाने आर्थिक फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी संबंधित उत्पाद नावाच्या इसमावर पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात कलम ३१८ अन्वये चार गुन्हा दाखल केला

मंदिर समितीच्या वतीने असे आवाहन करण्यात येते की श्रीच्या दर्शना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मार्फत कोणतेही शुल्क आकारे जात नाही व दर्शन ही संपूर्ण विनाशुल्क आहे त्यामुळे भाविक भक्तांनी कोणत्याही श्रीचे पदपरपर्षणासाठी आर्थिक व्यवहार करू नये असे यावेळी व्यवस्थापक मनोज शोत्री यांनी सांगितले तसेच याबाबत अगोदर अनेक वेळा आज सकाळी देखील समाज माध्यमाद्वारे त्यांनी आव्हान केले आहे.



## संपादकीय....

### फेरफार

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) १३१० बसच्या खरेदी प्रक्रियेची चौकशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने सुरू झाली असून निविदा प्रक्रियेची सर्व कागदपत्रे सादर करण्याचे आदेश महामंडळास देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे खरेदीसाठी २१ विभागनिहाय निविदा काढण्याच्या संचालक मंडळाच्या प्रस्तावास तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली असताना महामंडळाच्या स्तरावर निविदेतील अटी-शर्ती बदलण्यात आल्याचे समोर आले आहे. राज्य सरकारला अंधारात ठेवून परिवहन महामंडळाच्या गाड्या खरेदीत मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि काही ठरावीक ठेकेदारांवर मेहेरनजर दाखविण्यात आल्याचे समोर आल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी निविदा प्रक्रियेला स्थगिती देत चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी यांनी संबंधित कागदपत्रे सादर करण्याचे आदेश महामंडळास दिले आहेत. चौकशीचा ससेमिरा पाठी लागल्यामुळे महामंडळातील अधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता असल्याचे वृत्त आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नोव्हेंबर २०२३ मध्ये महामंडळाच्या संचालक मंडळाने विभागनिहाय १३१० बसगाड्या घेण्याचा निर्णय घेतला. या प्रस्तावास फेब्रुवारी २०२४ मध्ये शिंदे यांनी मान्यता दिली. मात्र त्यानंतर महिनाभरात परिवहन विभागाने मूळ प्रस्तावात बदल करून मुंबई, पुणे-नाशिक आणि अमरावती-नागपूर अशा तीन समूहांसाठी (क्लस्टर) निविदा काढण्याचा प्रस्ताव तयार केला. ठेकेदारांच्या हितासाठी निविदेतील अटी-शर्तींमध्येही बदल करण्यात आले. उपमहाव्यवस्थापक दर्जाच्या काही अधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव पुन्हा संचालक मंडळासमोर मांडण्याची भूमिका घेतली असता संबंधित अधिकाऱ्यांचीच बदली करण्यात आली आणि निविदा प्रक्रिया राबवण्यात आल्याची कळते.

# पत्रकार दिन व आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचे महत्त्व

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

६ जानेवारी हा दिवस राज्य मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सन १८३२ मध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले. दर्पण'च्या पहिल्या अंकात इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये माहिती दिली जात असे. यामुळे इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी व भावना समजून घेता आल्या. 'दर्पण'ने समाजातील अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुती यांविरुद्ध आवाज उठवला आणि लोकांना जागरूक केले. या वृत्तपत्राने साडे आठ वर्षे कार्य केले आणि १८४० मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. त्याच वर्षी त्यांनी दिग्दर्शन हे वृत्तपत्रही सुरू केले होते. मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू करून त्या माध्यमातून एतद्देशिय समाजाला प्रबोधित करण्याच्या केलेल्या कार्यामुळे त्यांना दर्पणकार म्हणून संबोधले जाते.

**आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवन व पत्रकारितेसह अन्य क्षेत्रात केलेल्या कार्याचे महत्त्व–**

बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म २० फेब्रुवारी १८१२ रोजी पोंभुर्ले, जि. सिंधुदुर्ग येथे झाला. तर १८ मे १८४६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी आपल्या शिक्षणाची सुरुवात घरच्या



वातावरणात केली आणि नंतर मुंबईत येऊन इंग्रजी व संस्कृत भाषेचा अभ्यास केला. त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून काम केले आणि विविध विषयांमध्ये प्रावीण्य मिळवले. त्यांना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलुगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या दहा भाषांचे ज्ञान होते.

**पत्रकारिता: एक सामाजिक बदल**

आचार्य जांभेकर यांचा विश्वास होता की पत्रकारिता समाजात एक महत्त्वाची भूमिका बजावते. त्यांनी पत्रकारितेसाठी एक नैतिक आधार तयार केला, ज्यामुळे लेखनात सत्यता, प्रामाणिकपणा आणि सामाजिक दायित्व यांचा समावेश झाला. त्यांच्या लेखनात त्यांनी समाजातील अन्याय, असमानता आणि अज्ञानावर प्रहार केला. यामुळेच पत्रकारिता या माध्यमाने लोकांची जागरूकता वाढवली. दर्पण'च्या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेचा पाया घातला. त्यांनी समाजातील समस्यांवर प्रकाश टाकला आणि लोकांना विचार करण्यास प्रवृत्त केले. त्यांनी दर्पणच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

**दर्पणचे महत्त्व**

दर्पण ने मराठी वाचकांना विविध विषयांवर विचार करण्यास प्रवृत्त केले. यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आणि सांस्कृतिक मुद्द्यांवर लेखन केले. दर्पणच्या माध्यमातून त्यांनी लोकशाहीच्या मूल्यांचा प्रचार केला आणि समाजात सुधारणा करण्याच्या दिशेने लोकांना प्रेरित केले.

**भाषिक समृद्धी**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी मराठी भाषेच्या समृद्धीसाठी केलेले कार्य. त्यांनी मराठी भाषेत विविध लेखन केले, ज्यामुळे मराठी भाषेची शुद्धता आणि सौंदर्य वाढले. दर्पणमध्ये त्यांनी विचारांची स्पष्टता आणि भाषाशुद्धतेवर विशेष लक्ष दिले. त्यांच्या लेखनाने अनेक वाचकांना मराठी भाषेचा अभिमान वाटला.

**शिक्षण आणि जागरूकता**

आचार्य जांभेकर यांना शिक्षणाचे महत्त्व समजले होते. त्यांनी शैक्षणिक विषयांवर लिहिताना शिक्षणाच्या प्रसारासाठी आणि सुधारण्यासाठी विविध उपाययोजना सुचवल्या. त्यांच्या विचारधारेत शिक्षणाने समाजात परिवर्तन घडवण्याची शक्ती आहे, हे स्पष्टपणे दिसते. त्यांनी पत्रकारितेचा उपयोग करून शिक्षणाच्या समस्यांवर प्रकाश टाकला. त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व ओळखून 'बाँबे नेटिव्ह जनरल लायब्ररी'ची स्थापना केली. त्यांनी अनेक विषयांवरील पाठ्यपुस्तके तयार केली, ज्यामुळे शिक्षणाच्या प्रसारात मोठा हातभार लागला. त्यांच्या कार्यामुळे मराठी भाषेत इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, छंदशास्त्र, नीतिशास्त्र यांसारख्या विषयांवरील पहिली पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली. बाळशास्त्री जांभेकर यांचे कार्य मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरले. त्यांनी ज्ञानेश्वरीची पहिली मुद्रित आवृत्ती काढली आणि अनेक शोधनिबंध लिहिले

**सामाजिक न्याय**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा पत्रकारितेत सामाजिक न्यायाचा विचार महत्त्वाचा होता. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे जातीय भेदभाव, स्त्री–पुरुष समानता आणि शोषणाच्या विरोधात आवाज उठवला. त्यांच्या कार्याने समाजातील असमानतेवर प्रहार केला, ज्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली. तसेच समाजातील रूढी, चालीरीती, अज्ञान यांविरुद्ध आवाज उठवला आणि समाज प्रबोधनासाठी त्यांनी 'दर्पण'चा उपयोग केला.

आचार्य जांभेकर यांचे कार्य आजही प्रासंगिक आहे. त्यांच्या विचारधारेला आधुनिक पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात महत्त्व आहे. त्यांच्या कार्यामुळे पत्रकारितेत एक नैतिक आधार तयार झाला, जो आजही पत्रकारितेचा आधारभूत आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक पत्रकारांनी त्यांच्या विचारधारेचा वापर करून समाजातील समस्यांवर प्रकाश टाकला. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा पत्रकारितेतील वारसा आणि कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी मराठी पत्रकारिता, भाषा, शिक्षण आणि सामाजिक न्याय यावर केलेले कार्य आजही प्रेरणादायक आहे. मराठी पत्रकारिता आणि समाजाच्या विकासात त्यांचे योगदान सदैव स्मरणीय राहील. त्यांनी सत्य, न्याय, आणि समाजाच्या भल्यासाठी पत्रकारिता करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या या आदर्शावरच पत्रकारिता करण्याचा निर्धार आजच्या पत्रकार दिनी सर्व पत्रकारांनी केला तरच आपण त्यांच्या विचारांचे खरे पाईक ठरू असे वाटते.

**– सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**सोलापूर.**

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय,मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण संकुलात कै. पंचप्पा कल्याणशेट्टी यांची जयंती विविध कार्यक्रमानी साजरी करण्यात आली.

यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी कै. पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना सांस्कृतिक विभाग प्रमुख कल्पना स्वामी यांनी म्हणाले, सरानी सामान्य कुटुंबामध्ये जन्म घेऊन, बिकट परिस्थितीत स्वतः बरोबर भावांचेही शिक्षण पूर्ण केले आणि प्रतिकूल परिस्थितीत महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेची स्थापना करून अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रम सुरू केले. कल्याणशेट्टी सरांनी जिद्द, चिकाटी व कष्टाने संस्था वाढवली, आज या शिक्षण संकुलात शिशु वर्गापासून पदव्युत्तर पदवी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. या संस्थेतून शिक्षण घेऊन आज अनेक माजी विद्यार्थी उच्च पदावर काम करत आहेत.

या कार्यक्रमास प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेमी विभागाचे दिगंबर जगताप, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, राजकुमार गवळी, पूजा कडबगावकर, स्वप्नाली जमदाडे, श्रीदेवी मायनाळे, सिद्रामप्पा पाटील, रवीकिरण दंतकाळे, सागर मठदेवरू, निशिगंधा कोळी, विद्या बिराजदार आदी शिक्षक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# माळेगावात पारंपारिक लोककला महोत्सवात कलाकारांनी जिंकली रसिकांची मने

## लोककला महोत्सवाचे आ. प्रंतापरावरा पाटील चिखलीकर यांचे हस्ते उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा प्रतिनिधी/शिवहार गालफाडे : श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा महाराष्ट्रातल्या मातीत जन्मलेल्या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी माळेगाव यात्रेत पारंपारिक कलामहोत्सवाची सुरुवात केली आहे. पारंपारिक लोककलांचे संवर्धन व कलाकरांना प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय असून, कलाकारांना शासकीय अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.



माळेगाव यात्रेत आज वैभव असलेल्या पारंपारिक लोककला महोत्सवाचे उद्घाटन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा कृषी अधिक्षक कृषी अधिकारी ब–हाटे, पोलीस निरिक्षक संजय निलपत्रेवार, आनंदराव पाटील ढाकणीकर, शंकरराव ढगे, रोहित पाटील, सचिन पाटील चिखलीकर, नरेंद्र गायकवाड, भगवानराव राठोड, लक्ष्मण भालके, सरपंच प्रतिनिधी हनुमंत धुळगंडे, बालाजी कदम आदींची यावेळी उपस्थिती होती.

पुढे ते म्हणाले, माळेगाव यात्रेत कायमस्वरूपी सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात येणार असून, जिल्हा नियोजन समितीकडून भरीव निधी उपलब्ध करून घेतला जाईल, असेही ते म्हणाले.

यावेळी जुन्या काळातील तमासगीर अशाताई सुकळकर, शाहीर रमेश गिरी, कलावंत लच्छु देशमुख यांचा स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन आ. चिखलीकर यांच्या हस्ते

महोत्सवाची सुरुवात शाहीर रमेश गिरी यांच्या महाराष्ट्र गीतने झाली. यावेळी रघुवीर खेडकर नाट्य मंडळ (सातारा), पांडुरंग मुळे नाट्य मंडळ, आनंद लोकनाट्य मंडळ, सविताराणी पुणेकर, हरीभाऊ बडे नगरकर व शिवकंन्या बडे नगरगर यांसह विविध कलाकारांनी गण गवळण, बतावणी, रंबाजी, लावणी व इतर पारंपारिक कला सादर करून रसिकांची मने जिंकली.

माळेगाव यात्रेतील पारंपारिक लोककला महोत्सवाने जिल्ह्यातील सांस्कृतिक वारशाला एक नवा आयाम दिला आहे. या महोत्सवातून महाराष्ट्रातील लोककलेचे महत्व अधोरेखित होत आहे.

## सहकार क्षेत्रातील कर्ज वसुली प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सहकार विभागाने पुढाकार घ्यावा

**सहकार मंत्री बाबासाहेब पाटील**

# राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी शासन कटीबद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : संपूर्ण राज्याच्या शहरी व ग्रामीण भागात सहकार चळवळ रुजलेली आहे. किंबहुना संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्याला आघाडीवर ठेवण्यात सहकार चळवळीचा मोठा वाटा आहे. त्यामुळे राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

सोलापूर येथे आयोजित सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ व स्मरणिका प्रकाशन प्रसंगी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी भारतीय रिझर्व बँकेच्या मध्यवर्ती मंडळाचे संचालक सतीश मराठे, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे, समारंभाचे स्वागत अध्यक्ष राजशेखर शिवदारे, बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, व्हाईस चेअरमन सुचेता थोबडे, बँकेचे सर व्यवस्थापक रामलाल शर्मा, सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा सहकारी बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

> ■ **कोणत्याही सहकारी संस्थानी यशस्वी होण्यासाठी प्रामाणिकता, स्वच्छता व शिस्तबद्धता या तीन गुणांचा अंगीकार करण्याचे आवाहन**
>
> ■ **सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक बँकेचा सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ संपन्न, स्मरणिकेचेही प्रकाशन**
>
> ■ **सर्व लोकप्रतिनिधी यांच्याकडून सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या**

सहकार मंत्री श्री. पाटील पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचा विकास ग्रामीण भागात रुजलेल्या सहकार चळवळीमुळे मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. देशातील अन्य राज्याचा विचार केला तर त्या राज्यामध्ये सहकार चळवळ व्यवस्थितपणे रुजलेली नाही, त्यामुळे शहरी व ग्रामीण भागात आवश्यक तेवढा विकास न झाल्यामुळे त्या राज्यातील नागरिक रोजगारासाठी महाराष्ट्र राज्यासह अन्य विकसित राज्यात स्थलांतर करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आपल्या राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना अधिक बळ देण्याचे धोरण शासनाने निश्चित केलेले असल्याचे त्यांनी सांगितले.

सहकारी चळवळीचे महत्त्व जाणून केंद्रीय सहकार विभागाने संपूर्ण देशभरात पुढील पाच वर्षात दहा हजार पेक्षा अधिक सहकारी संस्था स्थापित करण्याचे धोरण ठरवलेले आहे. राज्याचे सहकार विभाग ही सहकारी संस्थांमध्ये नव तंत्रज्ञानाचा वापर करून सहकारी संस्थांच्या उन्नतीला चालना देण्यासाठी सहकार्याची भूमिका निभावणार आहे. सहकारी संस्थांनी आपली विश्वासार्हता टिकवण्यासाठी आरबीआय ने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे असून कोणतीही सहकारी संस्था यशस्वी होण्यासाठी प्रामाणिकता, स्वच्छता व शिस्तबद्धता या तीन गुणांचा अंगीकार करावा, असे आवाहनही सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सुचित केले. सोलापूर जिल्ह्यातील ३२ नागरी सहकारी बँकापैकी २७ बँकांची परिस्थिती चांगली असून ही बाब सोलापूर जिल्ह्यात सहकार चळवळ व्यवस्थितपणे सुरू असल्याचे श्री पाटील यांनी सांगून सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभास शुभेच्छा देऊन या बँकेसह सर्व सहकारी बँकांना सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

भारतीय रिझर्व बँकेच्या मध्यवर्ती मंडळाचे संचालक सतीश मराठे यांनी देशभरात जवळपास चौदाशे सहकारी बँका असून त्यातील एक तृतीयांश बँका महाराष्ट्र राज्यात कार्यरत आहेत असे सांगून सहकार चळवळीला भाग भांडवल निर्माण करण्याचा मोठा प्रश्न असल्याचे सांगून सहकार कायद्यात बदल करून बँकांना भांडवल निर्मिती करण्यासाठी शासनाने विचार करावा. टेक्नॉलॉजी फंड निर्माण करून शासनाने सहकारी संस्थांना वित्तीय सहाय्य उपलब्ध करून द्यावे त्याप्रमाणेच कर्ज वसुली प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले.



आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख सुभाष देशमुख सचिन कल्याणशेट्टी व देवेंद्र कोठे यांनी आपले मनोगत व्यक्त करून सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी समारंभ निमित्त बँकेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रारंभी समारंभाचे स्वागत अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी बँकेच्या वाटचालीची माहिती दिली तर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी बँकेने १९७४ पासून आज रोजी पर्यंत केलेल्या व राबवलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सर्व लोकप्रतिनिधी व मान्यवर यांच्या हस्ते सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली तर बँकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे आभार बँकेच्या संचालक मंडळाकडून मानण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

## ठाकरे शिवसेनेच्या वतीने शिवसेना कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : लातूर शहरातील शिवसेना कार्यालयात शिवसेना लातूर जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन शिवसेना लातूर जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी यांच्या हस्ते करण्यात येऊन अभिवादन संपन्न झाले.




या प्रसंगी शिवसेनेचे रमेश माळी, त्र्यंबक स्वामी, पठाण सर, शेख सर, दिलीप भांडेकर, रमेश पाटील, विखार देशमुख, हनुमंत पडवळकर, भास्कर माने, शिवदास पवार, सुधाकर कुलकर्णी, रूशिकेश पाटील, संभाजी माळी, गणेश शिंदे राकेश रणखांब, दिपक चिंचकर, बाळु लड्डा. बाळु चव्हाण, सगर खाडगावकर उपस्थित होते




## श्री माणकेश्वर वाचनालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, महीला शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

वाचनालयाच्या माजी उपाध्यक्षा, विद्यमान संचालिका सुजाता तनपुरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती आणि प्रास्तविक प्रा. बाळासाहेब कापसे यांनी केले. या प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, चिटणीस बाळासाहेब कापसे, हिशोब तपासनीस दत्ता काका उगावकर, संचालक सुहास सुरळीकर , उपाध्यक्ष मेघा जंगम, सुजाता तनपुरे, प्रवीण तनपुरे, भोसले काका, धारराव , वाचनालयाचे प्र. ग्रंथपाल नितीन बनसोडे, कर्मचारी विद्या बेंद्रे, नंदकुमार पुंड, अनिता ईस्ते आदी उपस्थित होते.

## भिमाई आश्रमशाळेत सावित्रीबाई फुलेंची जयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : शिक्षण आणि साक्षरता क्षेत्रात महिलांच्या उन्नतीसाठी स्त्री शिक्षणाला पुढे नेण्याची क्रांतिकारी मशाल ज्यांच्याकडे होती, ज्योतिबांच्या मनातील पेटत्या ज्योतीला प्रज्वलित करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची जयंती भिमाई आश्रमशाळेत (दि.३) शुक्रवारी उत्साहात साजरी करण्यात आली.

मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे आणि मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात सावित्रीबाईंच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.






यावेळी भिमाई आश्रम शाळेच्या सहशिक्षिका मनिषा जगताप-मखरे यांनी सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमेला पुष्पहार,तथागत गौतम बुद्ध मूर्तीस व इंदापूरचे माजी नगराध्यक्ष, संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष दिवंगत रत्नाकर मखरेंच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### इंदापूरातील भैरवनाथ प्रतिष्ठानकडून सावित्रीच्या लेकींना फळं वाटप

यावेळी इंदापूर येथील भैरवनाथ प्रतिष्ठानकडून सावित्रीबाई फुलेंच्या जयंती निमित्त माळी महासंघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष विकास शिंदे यांच्यासह युवराज शिंदे, सौरभ शिंदे, रामभाऊ शिंदे, नागेश शिंदे, तुकाराम शिंदे, सोम नाथ रासकर, निवृत्ती शिंदे, अक्षय शिंदे यांनी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना फळं व बिस्किटांचे वाटप केले.

या प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला मखरे, सचिव ड. समीर मखरे, मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे तसेच विद्यार्थी, अधीक्षक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी सावित्रीच्या लेकींनी भाषणांतून सावित्रीबाई फुलेंच्या कार्याला उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नानासाहेब सानप यांनी केले.

## कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षणाचे द्वारे खुली केली. त्यामुळेच पुरोगामी महाराष्ट्राची निर्मिती झाली, म्हणून त्यांना स्त्री शिक्षणाचे जनक म्हणून संबोधले जाते. त्यांचे कार्य वंदनीय आहे. असे प्रतिपादन संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी यावेळी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, रविकिरण दंतकाळे, सिद्रामप्पा पाटील, श्रीदेवी मायनाळे, मनीषा दूधभाते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्पना स्वामी यांनी केले, सूत्रसंचलन पूजा कडबगावकर यांनी केले तर आभार स्वप्नाली जमदाडे यांनी मानले.



## वालचंद विद्यालयात सावित्रीबाई जयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित वालचंद विद्यालय जुनियर कॉलेज कळंब,तालुका इंदापूर जिल्हा पुणे.

येथे ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. प्रसंगी ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे युवा संचालक प्रतापसिंह कदम सर,कार्यक्रमाचे अध्यक्ष. श्रीमती रेडेकर मॅडम, प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेच्या सहशिक्षिका येवले मॅडम, वालचंद विद्यालयाचे प्राचार्य सुरेश अर्जुन सर, पर्यवेक्षक आळंद सर, जूनियर विभाग प्रमुख सावंत सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती गायकवाड मॅडम, विद्यालयातील सर्व उपस्थित शिक्षक स्टाफ माध्यमिक ज्युनिअर च्या सर्व विद्यार्थ्यांचे समवेत हा कार्यक्रम पार पाडण्यात आला, प्रसंगी कार्यक्रमाचे प्रस्ताविक जुनिअर विभागाचे प्राध्यापक पवार सर यांनी केले त्यांनी जयंत्या व पुण्यतिथी आपण का साजरी करत आहोत त्याचं उद्दिष्ट हे विद्यार्थ्यांना पटवून देऊन सावित्रीबाई विषयी माहिती देण्यात आली, तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या येवले मॅडम यांनी सावित्रीबाईंच्या जीवनातील काही प्रसंग सांगून आजच्या विद्यार्थ्यांना या महापुरुषांच्या विषयीचे महत्व पटवून देण्यात आले, शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती रेडेकर मॅडम यांनी सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या बाबतची सर्व इथंबूत माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली, त्यांनी सावित्रीबाईंच्या जन्मापासून त्यांचे सर्व कारकीर्द त्यामधील पुण्यामधील सुरू केलेली मुलींसाठी ची पहिली शाळा पहिल्या मुख्याध्यापिका ते १८९७ पर्यंतच्या प्लेग च्या साथी पर्यंतचा सर्व प्रवास त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मांडला.. तसेच १४ विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. इयत्ता पाचवी ते इयत्ता बारावी पर्यंतच्या विद्यार्थिनींनी आपला सहभाग नोंदविला. एकूणच कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

## ध्येय वेडेच लोक इतिहास घडवितात : सहाय्यक शिक्षिका डी.एस भैसारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोंडगांव देवी : अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पंचशील विद्यालय बाराभाटी येथे दि.३ जानेवारी २०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती 'बालिका दिन' म्हणून साजरी करण्यात आली.



या निमित्ताने भाषण, गीत गायन, रांगोळी व एक पात्री नाट्य तसेच गणित विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षा डी.एस भैसारे व मुख्याध्यापक व्ही.एम चव्हाण यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

उपरोक्त स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्स्फूर्तपणे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर भाषण व गीत गायन केले.

मुख्याध्यापक व्ही.एम चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना सांगितले की, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजातील अज्ञान व विषमता नष्ट करण्याचे ध्येय हाती घेतले आणि ते पूर्णत्व करण्यासाठो त्यांना समाजाचा रोष पत्करून अनेक हाल - अपेष्ठा सहन कराव्या लागल्या. तसेच तुम्हीही आपलं ध्येय निश्चित करून स्वतःचे उज्वल भविष्य घडवावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

तर अध्यक्षीय भाषणातून डी.एस भैसारे यांनी ध्येय वेडे लोकच इतिहास घडवू शकतात असे विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणाद्वारे संबोधित केले.

गणित शिक्षक ए.डी घानोडे यांची कल्पक वृत्ती व सुजनशीलता तसेच एस सी पुस्तोडे यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभाग यामुळे प्रश्नमंजुषा ही स्पर्धा अतिशय मनोरंजक व चुरशीचीच नव्हे तर ऐतिहासिक ठरली. कार्यक्रमाचे संचालन प्रसिद्धी प्रमुख जे.एम दोनाडकर व एन.बी गहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता नववीतील विद्यार्थिनी मानवी वाघाडे व श्रावणी मेश्राम यांनी केले. तर आभार त्रिषा नंदेश्वर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपआपली भूमिका पार पाडली.

## 'एमएएच-एमसीए -सीईटी २०२५' करिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु; २५ जानेवारी पर्यंत मुदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदव्युत्तर पदवी असलेल्या एमसीए च्या




प्रवेशाकरिता प्रवेश पूर्व परीक्षा देणे बंधनकारक आहे. यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'एमएएच-एमसीए-सीईटी- २०२५' या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन आणि कन्फर्मेशन करण्याची प्रक्रिया बुधवार, दि.२५ डिसेंबर २०२४ पासून ते शनिवार, दि.२५ जानेवारी २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे. पदवी उत्तीर्ण झालेल्या व पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एमएएच एमसीए-सीईटी २०२५ साठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीतील एमसीए विभागात उपलब्ध करण्यात आलीआहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.

पदव्युत्तर पदवी असलेल्या एमसीए च्या प्रवेशाकरीता अत्यंत महत्वपूर्ण समजली जाणारी 'एमएएच-एमसीए-सीईटी २०२५' ही परीक्षा साधारण मार्च २०२५ दरम्यान होणार आहे. एमसीएच्या या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची प्रक्रिया बुधवार, दि.२५ डिसेंबर २०२४ पासून ते शनिवार, दि.२५ जानेवारी २०२५ (रात्री.११.५९) पर्यंत पर्यंत चालणार आहे. या प्रवेश परीक्षेच्या संदर्भात अधिक माहीतीसाठी ु.ारहरलशीं. ेस या शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर तसेच स्वेरी अभियांत्रिकीच्या प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२११५४) व एमसीएचे विभागप्रमुख प्रा.मनसब शेख (मोबा.नं.९०२८९०७३६७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती तथागत ग्रुपच्या वतीने उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मेहकर येथे तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने जनसंपर्क कार्यालय मेहकर येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी संदिप गवई यांनी अतिशय उत्कृष्ट विचार मांडून आपले मनोगत व्यक्त करतेवेळी सांगितले की क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या पहिल्या महिला शिक्षिका असून त्यांनी अतिशय खडतर परिस्थितीतून महिलांना शिक्षणासाठी पहिली शाळा सुरू केली त्यांचे विचार प्रेरणा देणारे आहे त्यांचे विचार महिलांसाठी व समजासाठी प्रेरणा देणारी आहे आसे प्रतिपादन तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांनी केले यावेळी समस्त पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिरवळवाडी मराठी शाळेचा नृत्यात प्रथम क्रमांक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तालुकास्तरीय किशोरी मेळावा अंतर्गत साक्षरता गीत ह्यावर सादरीकरण करून जि. प. प्रा मराठी शिरवळवाडी शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा कु क्रांती सिद्धाराम शिरगापुरे व कु स्पुर्ती शंकर हन्नुरे ह्या विद्यार्थ्यांनीनी खोवला. सदर कार्यक्रम मा गटशिक्षणाधिकारी श्री प्रशांत अरबाळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आनंददायी वातावरणात पार पडला. वागदरी केंद्राचे केंद्रप्रमुख बसवराज मुनोळी साहेब तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धाराम शिरगापुरे, मुख्याध्यापिका निलीमा जाधव मॅडम, सहशिक्षक शिलू दोडतले मॅडम व ज्ञानेश्वर पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना पुढील अशाच प्रयत्नासाठी शुभेच्छा दिल्या.

